# वसंतराव नाईक प्रतिष्ठान





भारत सरकारने राष्ट्रीय स्तरावर
गौरविलेल्या महाराष्ट्रजनांचा

## अभिनंदन सोहळा

२२ मे २००८

# वसंतराव नाईक कृषि संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान

अभिनंदन सोहळ्याचे मानकरी – २२ मे २००८

## राष्ट्रीय पुरस्कार सन्मानित

### पद्मविभूषण २००८

- श्रीमती आशा भोसले
- श्री. सचिन तेंडूलकर
- श्री. रतन नवल टाटा

### पद्मभूषण २००७

- श्री. जमशेद जे. इराणी
- श्री. जावेद जान निसार अख्तर
- प्रा. (वैद्य) श्रीराम शर्मा
- श्री. तय्यब मेहता

### पद्मभूषण २००८

- डॉ. वसंत गोवारीकर
- श्री. बाबासाहेब निळकंठ कल्याणी
- श्री. के. व्ही. कामथ
- श्री. केकु एम. गांधी

### पद्मश्री २००७

- श्री. अस्ताद अदरबाद देबू
- कु. नैना लाल किडवाई
- श्री. रबिन्दर गोकालदास अहुजा
- डॉ. रवी नारायण बस्तिया
- श्रीमती शशिकला जवळकर
- श्रीमती तरला दलाल
- श्रीमती तिस्ता सेटलवाड
- डॉ. थानू पद्मनाभन

### पद्मश्री २००८

- श्रीमती माधुरी दिक्षित
- श्री. टॉम आल्टर
- डॉ. केईकी आर. मेहता
- डॉ. तात्याराव पुंडलिकराव लहाने
- श्री. भवरलाल हीरालाल जैन
- सिस्टम करुणा मेरी ब्रगेन्झा

### राष्ट्रपतींचे शौर्य पदक २००७

- कुमारी अस्मा अयुब खान
- कुमारी अंतरा राजू श्रीवास्तव
- कुमारी अंकिता अशोक भोसले
- कुमार पार्थ संजीव सुतारिया

# अभिनंदन सोहळ्याचे मानकरी

## पद्मश्री - २००८

### भवरलाल हीरालाल जैन

श्री भवरलाल हीरालाल जैन ज्यांना आदराने लोक 'बडे बाबू' म्हणून संबोधतात हे 'जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.' या कंपनीचे संस्थापक व अध्यक्ष आहेत.

श्री जैन यांचा जन्म १९३७ साली महाराष्ट्रातल्या वाकोड नावाच्या छोट्याशा खेड्यात झाला. हातगाडीवरुन घासलेट विकण्याचा व्यवसाय करणारे, कायद्याची पदवी संपादन केलेले श्री जैन यांनी त्यांच्या तीन पिढ्यांची मिळकत रु. ७,०००/- घेऊन व्यवसाय सुरु केला. दुचाकी व इतर वाहनांची एजंसी सुरु करुन त्यात नवनवीन सुधारणा करीत ट्रॅक्टर्स स्प्रिंकलर्स, पी.व्ही.सी. पाईप्स इत्यादिंची जोड करुन त्यांनी आपल्या व्यवसायाची भरभराट केली.

कृषी क्षेत्रातले श्री जैन यांचे योगदान फार महत्वाचे व उल्लेखनीय आहे.

१९८७ ते १९९८ या कालखंडात श्री जैन यांनी 'मायक्रो इरिगेशन' ची संकल्पना सर्वप्रथम राबवली.

श्री जैन यांना राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय स्तरावर २२ पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 'महाराणा प्रताप युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चर अँड टेक्नॉलॉजी' राजस्थान आणि 'कोकण कृषी विद्यापीठाने' त्यांना डॉक्टरेट दिली आहे.

२००८ साली भारत सरकारने श्री जैन यांना पद्मश्री चा सन्मान देऊन गौरविले आहे.